ePaper

# अजितदादांकडून काँग्रेसचा करेक्ट कार्यक्रम; दोन बडे नेते गळाला



| वर्ष - 8 | अंक - 238 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 17 मार्च 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

आतील पानांत

- रमजान महिन्यात होळी खेळणे गुन्हा!
- कोणता संघ अधिक चांगला?
- आम्ही शांततेसाठी प्रयत्न केले!
- पाकिस्तानींना लवकरच प्रवासबंदी?

## ‘मिशन क्रू-10’ यशस्वी; काउंटडाऊन सुरू

# विज्ञान तंत्रज्ञानाचा चमत्कार!

## अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बूच बिल्मोर 19 तारखेला पृथ्वीवर अलगद उतरणार !



**।न्यूयॉर्क : रॉयटर ।वृत्तसंस्था। महाईन्यूज**

**अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बूच बिल्मोर हे दोघे दि. १९ मार्चला पृथ्वीवर अगदी सुखरूप उतरणार आहेत, ही उत्साहवर्धक आणि स्फूर्तीदायक बातमी आंतरराष्ट्रीय अंतराळ संशोधक ‘नासा’ ने दिली आहे. केवळ आठ दिवसांसाठी अंतराळात झेपावलेले हे अंतराळवीर तब्बल नऊ महिने झाले अंतराळातच हवा विरहित कक्षेत घिरट्या घालत आहेत.**

### विज्ञान आणि तंत्रज्ञानाची कमाल !

भारतीय वंशाची सुनीता विल्यम्स आणि तिचा साथीदार बूच बिल्मोर यांचा पृथ्वीतलावर येण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. केवळ अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि विज्ञानाच्या आधारे हे दोघे जिवंत परत येत आहेत, ही खरोखर अभिमानास्पद गोष्ट आहे.

### आठ दिवसांसाठी गेले, नऊ महिने झाले

केवळ आठ दिवसांसाठी महत्त्वाच्या संशोधनासाठी अंतराळात झेपावलेले हे अंतराळवीर आता नऊ महिने झाले, हवा विरहित ठिकाणी घिरट्या मारत आहेत. ‘नासा’ आणि ‘स्पेस एक्स’ या आंतरराष्ट्रीय संघटनांनी या दोघांना सुरक्षित माघारी आणण्यासाठी ‘स्पेस क्राफ्ट’ पाठविले आहे आणि या दोघांना सुखरूप परत आणण्याच्या या मिशनला ‘क्रू-१०’ असे नाव देण्यात आले आहे.



### सहनशीलतेचा अक्षरश: अंत

हे दोघे अंतराळवीर तब्बल नऊ महिने अंतरिक्ष स्टेशनवर अडकून पडले आहेत. अमेरिका ही महान शक्ती आहे असे म्हटले जाते, पण नियतीपुढे हतबल होण्याची वेळ अमेरिकेवर आली. अशातच ‘नासा’ संघटनेने मनावर घेतले आणि त्या दोन्ही अंतराळवीरांना जिवंत परत आणण्याची संपूर्ण जबाबदारी ‘नासा’ वर टाकण्यात आली.

### मस्कने रॉकेट दिले

प्रसिद्ध संगणकतज्ञ आणि उद्योगपती एॅलन मस्क याने या विशेष मोहिमेसाठी आपले रॉकेट उपलब्ध करून दिले असून या दोघांना जेवढी मदत लागेल, तेवढा खर्च करण्याचा इरादा स्पष्ट केला आहे. त्यामुळेच आता १९ मार्चरोजी हे दोघे भूतलावर परत येत आहेत. स्पेसक्राफ्ट मधील तांत्रिक दोषामुळे तब्बल नऊ महिने अंतरिक्षात अडकून पडण्याची वेळ या अंतराळवीरांवर आली, कारण त्यांच्या स्पेस क्राफ्ट मध्ये मोठा तांत्रिक दोष निर्माण झाला. पण पृथ्वीवरून सर्व काही नियंत्रित केल्यामुळे ते त्या ठिकाणी जिवंत राहिले एवढेच !

### सुनीता विल्यम्सकडून नृत्य करून आनंद व्यक्त

पृथ्वीवर घेऊन जाणारे अंतराळ यान आंतरराष्ट्रीय स्थानकावर पोहोचल्याचे पाहताच सुनीता विल्यम्सने नृत्य करून आपला आनंद व्यक्त केला. ‘फाल्कन- ९’ रॉकेटच्या मदतीने ही मोहीम सुरू आहे आणि ड्रॅगन नावाचे हे यानही आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर पोहोचले आहे. या यानातून चार आंतरराष्ट्रीय अंतराळवीर देखील त्या ठिकाणी पोचले आहेत. तेच पुढील व्यवस्था करून अडकलेल्या दोन अंतराळवीरांची सुटका करणार आहेत.

### चार अंतराळवीर पोहोचले !

अवकाशात अडकलेल्या दोन अंतराळवीरांची सुटका करण्यासाठी अंतराळात अमेरिकेचे एन. मॅकलन आणि निकोल आयर्स, जपानचे तुकूया ओनिशी आणि रशियाचे किरील पेस्कोच अंतराळ स्थानकावर पोहोचले, त्यावेळी सर्व शास्त्रज्ञांनी एकच जल्लोष केला. सर्व अंतराळवीरांनी एकमेकांची गळाभेट घेऊन आनंद व्यक्त केला. आता या दोघांना घेऊन परतणारे अंतराळ यान हे फ्लोरिडाच्या समुद्रकिनाऱ्यावर उतरणार आहे. संपूर्ण जगासाठी हा अत्यंत अभिमानाचा क्षण म्हणावा लागेल ! सुनीता विल्यम्स आणि तिच्या सहकाऱ्याच्या पृथ्वीवर परतण्याच्या यशस्वी प्रक्रियेचे काऊंट डाऊन सुरू झाले आहे. प्रतीक्षा आहे ती १९ मार्चची!

## सुप्रिया सुळेंची धनंजय मुंडे यांच्यावर टीका

# सहा महिने थांबा आणखी एकाची विकेट!

## फालतू माणसाबरोबर काम करणे शक्य नाही : सुप्रिया सुळे

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**‘शंभर दिवसात एक विकेट गेली आहे. सहा महिने थांबा आणखी एकाची विकेट जाणार आहे. त्यांचे नाव आत्ताच जाहीर करणे योग्य नाही. मात्र जो बायकोच्या आड लपतो आणि सगळे उद्योग करतो. त्याची विकेट जाईल,’ असा गौप्यस्फोट खासदार सुप्रिया सुळे यांनी रविवारी येथे केला.**



‘बरे झाले पक्ष फुटला. जो दोन मुले असलेल्या बायकोच्या वाहनामध्ये बंदूक ठेवू शकतो. अशा फालतू माणसाबरोबर काम करणे शक्य नाही,’ अशा शब्दात सुळे यांनी धनंजड मुंडे यांच्यावर टीका केली. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या वतीने आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मेळावा रविवारी झाला. त्यावेळी कामाचा आढावा सुळे यांनी घेतला. पुण्याचे प्रभारी आणि आमदार शशिकांत शिंदे, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, युगेंद्र पवार यांच्यासह पुणे, पिंपरी-चिंचवडसह जिल्ह्यातील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महायुतीच्या कारभारवर त्यांनी यावेळी जोरदार टीका केली. ‘बीड जिल्ह्यातील संतोष देशमुख आणि महादेव मुंडे यांच्या घरी एकदा भेट द्या. तिथे काय परिस्थिती आहे ते कळेल. देशमुख यांना मारहाण होत असताना त्यांना दूरध्वनी आले होत. ही बाब मला मिळालेल्या एका माहितीतून समोर आली आहे. फोन सुरू असताना त्यांची हे गंमत पहात होते. ही खूप मोठी विकृती आहे.

अवादा कंपनीला काम मिळू नये, म्हणून एका गृहस्थाने केंद्र सरकारला तीन पत्रे दिली आहेत. पत्रही त्यांनी द्यायची आणि खंडणीही त्यांची घ्यायची, असा प्रकार आहे. हाच आकाचा तोच आका आहे,’ असे सुळे यांनी सांगतानाच ‘एक वेळ विरोधात बसेन. मात्र, नैतिकता सोडणार नाही,’ असे सांगितले.पक्षाकडून मतदारांच्या मोठ्या अपेक्षा आहेत. हार-जीत सुरूच असते. शंभर दिवसात एक विकेट गेली आहे. सहा महिन्यात आणखी एकाची विकेट जाणार आहे. त्याचे नाव आत्ताच जाहीर करणे योग्य नाही. मात्र, तो बायकोच्या आड लपतो आणि सर्व उद्योग करतो. हिंमत असेल तर, समोर येऊन लढावे ही लढाई मोठी आहे, असे सुळे यांनी स्पष्ट केले.यची, असा प्रकार आहे. हाच आकाचा तोच आका आहे,’ असे सुळे यांनी सांगतानाच ‘एक वेळ विरोधात बसेन. मात्र, नैतिकता सोडणार नाही,’ असे सांगितले.पक्षाकडून मतदारांच्या मोठ्या अपेक्षा आहेत. हार-जीत सुरूच असते. शंभर दिवसात एक विकेट गेली आहे. सहा महिन्यात आणखी एकाची विकेट जाणार आहे. त्याचे नाव आत्ताच जाहीर करणे योग्य नाही. मात्र, तो बायकोच्या आड लपतो आणि सर्व उद्योग करतो. हिंमत असेल तर, समोर येऊन लढावे ही लढाई मोठी आहे, असे सुळे यांनी स्पष्ट केले.

### धनंजड मुंडे यांच्यावर टीका

‘बरे झाले पक्ष फुटला. जो दोन मुले असलेल्या बायकोच्या वाहनामध्ये बंदूक ठेवू शकतो. अशा फालतू माणसाबरोबर काम करणे शक्य नाही,’ अशा शब्दात सुळे यांनी धनंजड मुंडे यांच्यावर टीका केली. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या वतीने आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मेळावा रविवारी झाला. त्यावेळी कामाचा आढावा सुळे यांनी घेतला.

## राज्यापेक्षा धर्माचे अधिष्ठान मोठे!

## वारकरी, धारकरी, लाडक्या बहिणी, भावांचा पुरस्कार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**‘देहूच्या पवित्र भूमीत छत्रपती शिवाजी महाराज हे संत तुकाराम महाराजांच्या भेटीला आले होते. छत्रपती शिवाजी महाराज यांना तुकोबांचे मार्गदर्शन होते. आशीर्वाद होता. धर्म आणि अध्यात्माचे अधिष्ठान हे राज्याच्या अधिष्ठानापेक्षा कायम मोठे असते,’ असे मत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी व्यक्त केले.**




जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांच्या ३७५ व्या बीज सोहळ्यानिमित्त देहू संस्थानच्या वतीने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना ‘श्री संत तुकाराम महाराज पुरस्कार’ प्रदान करण्यात आला. त्या वेळी शिंदे बोलत होते. देहू संस्थानचे अध्यक्ष पुरुषोत्तम महाराज मोरे, देवस्थानचे विश्वस्त माणिक महाराज मोरे, संजय महाराज मोरे, आळंदी देवस्थानचे मुख्य विश्वस्त योगी निरंजननाथ, खासदार श्रीरंग बारणे, आमदार विजय शिवतारे, शरद सोनवणे या वेळी उपस्थित होते.शिंदे म्हणाले, ‘देहूच्या भूमीवर ३७५ वर्षांत शेकडो वारकऱ्यांनी विठूनामाचा गजर केला. दिंड्या काढल्या. संत ज्ञानेश्वर महाराज श्वास, तर संत तुकाराम महाराज महाराष्ट्राचा प्रश्वास आहेत. तुकोबांची अभंगगाथा पाचवा वेद मानला जातो.

तुकाराम महाराजांसाठी परमेश्वराने पुष्पक विमान पाठविले. या भूमीतून ते सदेह वैकुंठाला गेले. या दैवी घटनेला ३७५ वर्षे पूर्ण होत आहेत. तुकोबांच्या रचना आपल्या जगण्यावर भाष्य करतात. ३७५ वर्षांनंतरही कालबाह्य झालेल्या नाहीत. पुढील ३६५ वर्षच नव्हे तर ३,३७५ वर्ष या रंचनांमधील अर्थ लोप पावणार नाही. अभंग रूपाने तुकाराम महाराज आपल्यात आहेत. तुकोबांनी चारशे वर्षांपूर्वी क्लिष्ट असे तत्त्वज्ञान सोप्या मराठीत सांगितले. हाच मराठीचा अभिजात दर्जा होता.’धर्माबरोबरच निसर्गाचे रक्षण करणे सर्वांचे कर्तव्य आहे. नद्या रक्तवाहिन्या आहेत.

संतांनी नद्यांच्या काठी आयुष्य घालवले. इंद्रायणी, चंद्रभागा, गोदावरीसह इतर तीर्थस्थळांवरून वाहणाऱ्या नद्यांची परिस्थिती बरी नाही. नदी प्रदूषण मुक्तीची लोकचळवळ झाली पाहिजे. नद्या आदर्श बनल्या पाहिजेत,’ असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले.‘माझ्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्याला देहू संस्थानने पुरस्कार दिला. पुरस्कारासाठी योग्य समजले, हे माझ्यासाठी फार भाग्याचे आहे. मनात आनंद, समाधान आहे. वारकरी संप्रदायाबद्दल पूर्वीही आदर होता. आज अधिक वृद्धिंगत झाला. हा पुरस्कार एकट्याचा नाही. माझ्यावर, माझ्या कामावर प्रेम करणाऱ्या, वारकरी, धारकरी, शेतकरी, लाडक्या बहिणी, लाडक्या भावांचा सर्वांचा पुरस्कार आहे. पुरस्कार मिळाल्याने माझी जबाबदारी वाढली आहे,’ असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

### निसर्गाचे रक्षण करणे सर्वांचे कर्तव्य

जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांच्या ३७५ व्या बीज सोहळ्यानिमित्त देहू संस्थानच्या वतीने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना ‘श्री संत तुकाराम महाराज पुरस्कार’ प्रदान करण्यात आला. त्या वेळी शिंदे बोलत होते.संजय महाराज मोरे, आळंदी देवस्थानचे मुख्य विश्वस्त योगी निरंजननाथ, खासदार श्रीरंग बारणे, आमदार विजय शिवतारे, शरद सोनवणे या वेळी उपस्थित होते.

## आमदार महेश लांडगे यांची मागणी

# औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसाठी हवी अध्ययावत इमारत!

## महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना पत्र

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने शहरात मोरवाडी येथे औद्योगिक प्रशिक्षण संस्था संचलित केली जाते. मोरवाडी येथे संस्थेची इमारत आहे. मात्र, सदर इमारत जुनी झाली असून, ही जागा अपुरी पडत आहे. त्यामुळे प्रशासनाच्या वतीने आणि राज्य सरकारच्या मदतीने औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकरीत कायमस्वरुपी नवीन अध्ययावत सोयी-सुविधायुक्त इमारत उभारावी, अशी मागणी भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.**



याबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना पत्र दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, सध्यस्थितीमध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोरवाडी व कासारवाडी येथे 20 ट्रेडसचे प्रशिक्षण देण्यात येते. या ठिकाणी एकूण 42 तुकड्या आहेत. काही दिवसांपूर्वी, महानगरपालिका प्रशासन आणि शहरासह हद्दीलगतच्या औद्योगिक अस्थापना यांच्या संयुक्त विद्यमाने "भारतातील उद्योगांच्या भविष्यातील मागण्या पूर्ण करणारे ITI ट्रेड ओळखणे" या विषयावर कार्यशाळा झाली. त्यावेळी महानगरपालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे विस्तारीकरण आणि अपग्रेडेशनबाबत चर्चा झाली होती.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे विस्तारीकरण आणि नवीन ट्रेड्सच्या समावेशानंतर शहर आणि सभोवतालच्या परिसरातील औद्योगिक संस्थांशी समन्वय करता येईल. त्या माध्यमातून प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना नोकरी व रोजगाराच्या संधी निर्माण होतील, असा विश्वासही आमदार लांडगे यांनी व्यक्त केला आहे.



> “ पिंपरी-चिंचवड औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या विस्तारासाठी आणि अद्ययावतीकरणासाठी नवीन जागेची निश्चिती करावी. त्या अनुशंगाने शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी आयटीआयची प्रशासकीय इमारत, कार्यशाळा, सेंटर ऑफ एक्सलन्स असे संकूल तयार करावे. यासाठी कौशल्य विकास विषयक बाबींसाठी सुनियोजित व अद्ययावत पद्धतीने पायाभूत सुविधा विकसित कराव्यात, अशी सूचना महापालिका प्रशासनाला केली. त्या अनुशंगाने सकारात्मक कारवाई होईल, असा विश्वास आहे.
>
> **–महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

---

## देहूनगरी तुकोबांच्या नामगजराने दुमदुमली!

### बीजसोहळ्याला भाविकांची अलोट गर्दी

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या नामगजराने रविवारी देहूनगरी दुमदुमली. भजनी दिंड्यांनी रात्रभर केलेला जागर, काकडा आरती, महापूजा, हरिपाठ अन् वीणा, टाळ, मृदंग, चिपळ्यांची साथ अशा भक्तिमय वातावरणात ३७५ वा बीज सोहळा झाला. दुपारी बारा वाजता नांदुरकीच्या वृक्षावर फुलांची उधळण करून आणि मनोभावे हात जोडत भाविकांनी इंद्रायणीच्या काठी भक्तिचैतन्य फुलविले.**



जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचे आजच्या दिवशी सदेह वैकुंठगमन झाले. त्यामुळे हा दिवस तुकाराम बीज म्हणून ओळखला जातो. यंदाचा तुकाराम महाराजांचा त्रिशतकोत्तर अमृतमहोत्सवी वैकुंठगमन सोहळा लाखो भाविकांच्या उपस्थितीत उत्साहात साजरा झाला. देहूनगरीत या दिव्य सोहळ्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून लाखो वारकरी दाखल झाले होते. पहाटे चार वाजता मुख्य देऊळवाड्यात काकडारती झाली.

पहाटे साडे पाच वाजता देऊळवाड्यातील विठ्ठल-रुक्मिणी पूजा, संत तुकाराम महाराज शिळा मंदिरातील महापूजा आणि वैकुंठगमन स्थान येथील पूजा संस्थानाचे अध्यक्ष पुरुषोत्तम महाराज मोरे आणि विश्वस्त यांच्या हस्ते झाल्या. प्रांत अधिकारी यशवंत माने, तहसीलदार जयराज देशमुख, वैद्यकीय अधिकारी डॉ. किशोर यादव, विश्वस्त माणिक महाराज मोरे, संजय महाराज मोरे, भानुदास महाराज मोरे, संतोष महाराज मोरे, अजित महाराज मोरे, विशाल महाराज मोरे यावेळी उपस्थित होते. सकाळी दहा वाजता हरीनामच्या गजरात पालखीचे वैकुंठस्थान मंदिराकडे प्रस्थान झाले.


त्यानंतर वैकुंठगमन सोहळ्यात बापूसाहेब देहूकर महाराजांचे वैकुंठगमन प्रसंगावर कीर्तन झाले. 'धोंटविन लाळ ब्रह्मज्ञान्याहाती' यावर आधारित कीर्तन झाले.

फडकरी, वारकरी, मानकरी यांचा सत्कार झाला. साडे अकरा वाजता पालखीची वैकुंठगमन मंदिराला प्रदक्षिणा झाली. दुपारी बारापर्यंत तुकोबारायांच्या नामाचा, विठ्ठलाच्या नामाचा गजर झाला. बारा वाजता नांदुरकीच्या वृक्षावर फुलांची उधळण करून, मनोभावे हात जोडत भाविकांनी इंद्रायणीच्या काठी भक्तिचैतन्य फुलविले. दुपारी साडेबारा वाजता वैकुंठस्थान येथून पालखीचे मुख्य देऊळवाड्यातील मंदिराकडे आगमन झाले. हा सोहळा पाहण्यासाठी भाविकांची अलोट गर्दी झाली होती. अडीच लाखांहून अधिक भाविक बीज सोहळ्याला उपस्थित होते.

#### कडेकोट पोलीस बंदोबस्त

मंदिर परिसराच्या दोन्ही बाजूंना फेरीवाले, पथारीवाले यांना प्रतिबंध करण्यात आला होता. मंदिर आवारात त्रिस्तरीय सुरक्षाव्यवस्था तैनात होती. कडेकोट पोलीस बंदोबस्त होता. देहूत प्रवेश करणाऱ्या मार्गावर सुरक्षा कठडे लावले होते. गावात वाहनांना प्रवेश बंद केला होता.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### प्रपंचातील आसक्ती कमी कशी होईल ?

आज आमची स्थिती कशी झाली आहे पाहा; प्रपंच आम्हाला सुटत नाही; भगवंताचे प्रेम आम्हाला पाहिजे; या प्रपंचावरचे प्रेम न सोडता आम्हाला भगवंताचे समाधान लाभावे अशी आमची इच्छा आहे. खरोखर, प्रपंचातले आमचे हे प्रेम व्यभिचारी आहे. प्रेम ही वस्तू अशी आहे की, ती एकाच ठिकाणी ठेवता येईल. एका म्यानात ज्याप्रमाणे दोन तलवारी राहू शकत नाहीत, त्याप्रमाणे आमचे प्रेम आम्हाला दोन ठिकाणी ठेवता येणार नाही. आमचे खरे सुख एका भगवंताजवळच आहे; आणि ते मिळविण्यासाठी आम्ही प्रपंच सोडायलाच पाहिजे असे नाही. प्रपंचात आम्हाला वाटणारी आसक्ती ही मुख्यत: नाहीशी झाली पाहिजे. शास्त्रातसुद्धा हेच सांगितले आहे. शास्त्र हे अनुभवाचे बनलेले आहे. आमचा अनुभव आम्ही शास्त्राबरोबर पडताळून पाहात नाही. प्रपंचाची खरी किंमत आम्हाला कळल्याशिवाय त्याच्याबद्दल वाटणारी आमची आसक्ती कमी होणार नाही. आज प्रपंचात सुख नाही हे अनुभवाला येऊनही त्याची आसक्ती आम्हाला सुटत नाही. ती आसक्ती सुटायला काय मार्ग आहे तो आम्ही पाहणे अगदी जरूर आहे. प्रपंचाची आम्हाला गरज किती आहे? एखादा मनुष्य फिरायला जाताना हातात काठी घेतो. त्याला हातात काठी घेणे हे भूषण आहे असे कोणी म्हणत नाही. त्याप्रमाणे भगवंताकडे जायला प्रपंचाची आम्हाला आधारापुरतीच गरज आहे. हा प्रपंच करीत असताना त्याची आसक्ती कमी होऊन भगवंताचे प्रेम येण्यासाठी, शास्त्रांनी घालून दिलेली बंधने आम्ही पाळली पाहिजेत आणि त्यासाठी आपले आचार-विचार आणि उच्चार आम्ही सांभाळणे जरूर आहे. आपण आपल्या संस्कारांप्रमाणे वागलो तर निवृत्तिमध्येच जाऊ; कारण आपली प्रवृत्ती ही सर्व निवृत्तिपरच आहे यात संशय नाही. आता यापुढे आपण रामाच्या नावाने प्रपंचाचा धंदा करू या, म्हणजे नफातोटा त्याचाच होईल. प्रपंचात सदाचाराने वागावे. सदाचार हा मूळ पाया आहे. नीतिधर्माचे आचरण असावे. नीतिधर्माची बंधने ही आमचे विकार आवरण्यासाठीच आहेत. विचाराने अत्यंत पवित्र असावे. कोणाचा द्वेष, मत्सर करू नये आणि दुसऱ्याचे अहित चिंतू नये. उच्चार तर फार सांभाळले पाहिजेत. नेहमी सर्वांशी गोड बोलावे. ज्या जिभेने आपण भगवंताचे नाम घेतो, त्या जिभेने दुसऱ्याचे अंत:करण कधीही न दुखावेल याची खबरदारी घ्या. अंत:करण दुखवीत असताना त्याच्या ठिकाणी वास करीत असलेल्या भगवंतालाच आपण दुखवीत असतो हे ध्यानात धरा.

**बोधवचन:- प्रपंचातले आपले मन आपण काढून भगवंताकडे लावावे. तसे करण्यात समाधान आहे.**

# क्रूरकर्मा औरंग्याच्या कबरीचा मुद्दा हिंदुत्ववाद्यांच्या डोक्यात !



**'स्टेट'मेंट**

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**गेल्या आठवड्यात समाजवादी पक्षाचे नेते अबू आझमी यांनी क्रूरकर्मा औरंग्याचा उल्लेख आणि तुलना संतांशी केली. त्याने मंदिरे पाडली नाहीत, तर बांधली आणि औरंगजेब हा संयमी, संवेदनशील होता, असे म्हणण्यापर्यंत आझमी यांची मजल गेली. छत्रपती शंभुराजांना तब्बल ४० दिवस हालहाल करून त्यांचा एक एक अवयव काढत, त्यांना नरकयातना देत या नराधमाने ठार केले, त्याचे कौतुक हिंदुत्ववाद्यांना कशासाठी ? यावरून पुन्हा एकदा औरंग्याविरोधात समाजात मोठी लाट उसळली आणि हिंदुत्ववादी संघटना प्रचंड आक्रमक झाल्या आहेत.**



### औरंग्याची कबर हटवा, नाहीतर बाबरी करू..

हा महाराष्ट्र छत्रपती शिवराय आणि छत्रपती शंभुराजे यांचा, त्यांना दैवत मानणाऱ्या मराठी माणसाचा आहे, प्रत्येक हिंदूसाठी औरंग्या हा क्रूरकर्मा आणि नराधमच आहे, हे या अबू आझमी सारख्यांच्या पिलावळीला ठणकावून सांगण्याची गरज आहे आणि ती वेळ आली आहे. नेमका हाच मुद्दा घेऊन विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दल या जहाल हिंदुत्ववादी संघटना आक्रमक झाल्या आहेत. त्यांनी प्रशासनाला थेट इशाराच देऊन टाकला आहे.

### नाहीतर चलो, संभाजीनगर!

औरंग्याची कबर ज्या छत्रपती संभाजी नगरमध्ये आहे, ती ताबडतोब हटवावी, अन्यथा, आम्ही तिची 'बाबरी' करू.. म्हणजे बाबरी मशिदीवर ज्याप्रमाणे करसेवकांनी आक्रमण केले आणि ती उद्ध्वस्त केली, तीच अवस्था औरंग्याच्या कबरीची करू, अशी ती धमकी आहे. या कबरीखाली दफन केलेला औरंग्या पुन्हा उठून हिंदुत्ववाद्यांच्या मानगुटीवर बसला आहे की काय, हे महत्त्वाचे आहे, पण हा कळीचा मुद्दा पुन्हा चव्हाट्यावर येणार आहे आणि वातावरण तापणार आहे, हे नक्की !

### औरंग्याचे कोडकौतुक कशासाठी?

औरंग्याचे कौतुक सांगणारे देशद्रोही नेहमी एक उदाहरण देत असतात. ते म्हणजे मुघलांनी जेव्हा रायगड किल्ला जिंकला, त्यावेळी कैद केलेल्या थोरले शाहू महाराज, महाराणी येसूबाईसाहेब सरकार तसेच इतर कैद्यांना काही इजा पोहचवली नाही. तसेच मानसन्मान राखला गेला..वगैरे वगैरे. आता, विषय असा आहे, की ज्यावेळी ही राजमंडळी मुघलांच्या हाती लागली, त्यावेळी तह झाला होता आणि त्या तहानुसार कैद्यांना मानाने आणि सुरक्षित ठेवण्याचा करार झालेला होता. शिवाय, औरंग्याची राजकीय अपरिहार्यता देखील होती, त्यामुळे त्याला हे नाटक करणे भाग पडलेले होते, त्याची ती मजबुरी होती !

### क्रूर, कपटी आणि कावेबाज औरंग्या..

औरंग्या हा जितका धर्मांध, क्रूर होता, तो तितकाच कावेबाज आणि कपटीदेखील होता. औरंग्या आणि मुघल सैन्य यांच्यापुढे त्याकाळी नेमकी कोणती राजकीय अपरिहार्यता होती? मुघलांची आर्थिक तसेच लष्करी ताकदीची परिस्थिती काय होती, हे बघितले पाहिजे. औरंग्या दक्षिणेत उतरला, त्याने मराठा स्वराज्य जिंकण्यासाठी प्रयत्न केले. पण, त्याला ते काही जमले नाही. त्यावेळी त्याने आदिलशाही आणि कुतुबशाही जिंकून घेतली, मुघल आणि मराठा संघर्षाला मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध म्हणून इतिहासात ओळखले जाते. औरंग्याची दक्षिण मोहिम ही मराठा स्वराज्य जिंकता न आल्यामुळे लांबत चालली होती. त्याला त्याचे सैन्य देखील वैतागले होते. या संदर्भात मुघल इतिहासकार भीमसेन सक्सेना लिहितात, ते वाचणे क्रमप्राप्त आहे.. "लष्करात परिस्थिती सर्व प्रकारे विचित्र झाली होती आणि अनास्था ओढवली होती. सारख्या मोहिमांपाठोपाठ मोहिमा सुरू होत्या. त्यामुळे सरदार आणि सैनिकांना एकाकी जीवन कंठावे लागत होते. त्यांनी आपली बायकामुले लष्करात बोलावून घेतली आणि लष्करात संसार थाटला, तिथेच त्यांना मुलेबाळे झाली. ती लष्करातच मरण पावली. दगडमातीच्या घराची तोंडे त्यांच्या दृष्टीस पडली नाहीत. त्यांना हेच वाटे, की जगात उत्तम निवासस्थान म्हणजे तंबू ! एकूणच सर्व सैनिक औरंग्याला वैतागलेले होते."

### औरंग्या अयशस्वी आणि अपयशी

औरंग्या हा दक्षिणेत उतरून बराच काळ झाला होता, पण तो उत्तरेत जाण्याचा विचार करत नव्हता. त्यासंदर्भात इतिहासात एक नोंद अशी आहे, की "बादशाहला दक्षिणेच्या युद्धाविषयी पश्चाताप होत असून तो दिल्लीला जाण्यास उत्सुक आहे. तथापि, तो जाऊ शकत नाही. याचे कारण तो उत्तरेकडे गेला, की मराठे सर्व दक्षिण जिंकून उत्तरेकडील साम्राज्याचे देखील लचके तोडतील, अशी त्याला भीती वाटते." हे संदर्भ पाहिले की प्रत्यक्ष परिस्थितीच लक्षात येते.

### पैशाची दिवाळखोरी, तिजोरीत खडखडाट

आता औरंग्याची अर्थात् मुघलांची आर्थिक परिस्थिती त्याकाळी कशी होती, त्यासंबंधी एक नोंद सापडते, ती पाहू."शहाजहान बादशाहने साठवलेला सगळा खजिना औरंगजेबाने या मोहिमेत ओतला. दुसरी एक नोंद अशी आहे की, एवढ्याने भागले नाही म्हणून औरंगजेबाने जहाँगीर, अकबर यांनी साठवलेले खजिने बाहेर काढले. ते वापरले, तरीही सैन्याला पगार वेळेवर मिळत नसे. एक नोंद अशी पण आहे, की "मराठ्यांचा एक किल्ला जिंकल्यानंतर किल्ल्यावरील गहू आणि इतर धान्य विकून औरंगजेबाने आपल्या सैन्याचे पगार करण्याचे आदेश दिले होते.." चारही बाजूंनी औरंग्या खचला होता आणि आमच्या अबू आझमींनी मात्र त्याला देव्हाऱ्यात बसवण्याचे पाप केले आहे.

### कैद्यांना जबरदस्तीने बाटवले..

स्वतःच्या भावांचा खून करणाऱ्या, आपल्या वडिलांना तसेच मुलीला देखील अटकेत टाकणाऱ्या औरंग्याने कैदेत थोरले शाहू महाराजांच्या धर्मांतराचा प्रयत्न केला, कित्येक कैदेतील लोकांना बळजबरीने बाटवले, तसेच शंभूछत्रपती आणि राजाराम महाराज यांच्या कैदेत असलेल्या दासीकन्यांचा विवाह औरंगजेबाने बळजबरीने मुस्लिम सरदारांशी लावून दिला. इतकी स्पष्ट उदाहरणे असूनही जर काही लोकांना अजूनही औरंग्याचा पुळका येत असेल, तर त्याला काय म्हणायचे ? त्यांना जोड्याने मारण्याची शिक्षा द्यायला हवी !

### हिंदुत्ववादी संघटनांची आक्रमणाची भाषा

आता, हिंदुत्ववादी संघटना आक्रमक झाल्या असून औरंग्याचे उदात्तीकरण कोणत्याही परिस्थितीत होऊ शकत नाही. कित्येक उदाहरणे इतिहासाच्या पानांवर आपल्याला मिळतील, त्याचा सरकारने विचार करावा, असे त्यांचे म्हणणे आहे. आता विचार करा औरंगजेबाची आणि मुघल सैन्याची ही अशी दयनीय परिस्थिती असताना त्याला कैदेत असलेल्या थोरले शाहू महाराज, येसूबाईसाहेब सरकार आणि इतर लोकांवर अत्याचार कसे करता येतील ? उगीच औरंग्याचे उदातीकरण म्हणूनच थांबवा, असा इशारा हिंदूविरोधी समाजकंटकांना देण्यात आला आहे.

### अयोध्येचा इतिहास आठवा..

अयोध्येतील श्रीराम मंदिराचा लढा पाचशे वर्षे चालला. न्यायालयाचा निर्णय होत नव्हता, नंतरचे सत्ताधारी या लढ्याच्या विरोधातील निघाले. अयोध्येला निघालेल्या करसेवकांवर गोळीबार झाला, असे सत्ताधारी त्यावेळी लाभले. शेवटी घुसमटलेल्या हिंदूंच्या भावनांचा स्फोट झाला आणि प्रशासन, पोलिसांना न जुमानता त्या बाबरी ढाच्यावर हल्ला झाला आणि त्याला जमीनदोस्त केला. ही परिस्थिती पुन्हा येऊ नये, म्हणून सरकारनेच योग्य पाऊल टाकले पाहिजे, ही छोटीशी अपेक्षा ! कारण हिंदुत्ववाद्यांची ही भूमिका असेल, तर सध्याचा उद्धव ठाकरे गट आणि शरद पवार गट हे विरोधी भूमिका घेणार, हे वेगळे सांगायला नको, शिवाय दिशाहीन काँग्रेसला औरंग्याचा प्रचंड पुळका आहे, हे वेळोवेळी सिद्ध झालेलेच आहे !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# औरंगजेब क्रूर शासक होता!

## औरंगजेबाच्या कबरीवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणात औरंगजेबाच्या कबरीवरून चांगलंच राजकारण तापलं आहे. औरंगजेबाच्या कबरीवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. काही दिवसांपूर्वी समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी औरंगजेब क्रूर शासक नव्हता, असं विधान केलं होतं. त्यांच्या या विधानानंतर सुरु झालेले आरोप-प्रत्यारोप अद्यापही सुरु आहेत. यातच छत्रपती संभाजीनगरमधील औरंगजेबाची कबर हटवण्याची मागणी काही संघटनांकडून केली जात आहे.**





असं असतानाच आता काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची थेट औरंगजेबाशी तुलना करणारे विधान केलं आहे. हर्षवर्धन सपकाळ यांनी देवेंद्र फडणवीस यांची तुलना औरंगजेबाशी केल्यामुळे त्यांच्यावर आता टीकेची झोड उठली आहे. यावरून आता राज्याचं राजकारण पुन्हा एकदा तापलं आहे. "औरंगजेब क्रूर शासक होता, आज देवेंद्र फडणवीसही तेवढेच क्रूर आहेत", असं विधान हर्षवर्धन सपकाळ यांनी माध्यमांशी बोलताना केलं आहे. त्यांच्या या विधानानंतर आता भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांकडून सपकाळ यांच्यावर टीका करण्यात येत आहे.औरंगजेब हा क्रूर शासक होता. औरंगजेबाने स्वत:च्या वडिलांना जेलमध्ये टाकलं. तसेच औरंगजेब हा नेहमी धर्माचा आधार घ्यायचा. औरंगजेब हा क्रूर शासक होता. आज देवेंद्र फडणवीस हे देखील तेवढेच क्रूर आहेत. ते देखील कायम धर्माचा आधार घेतात. त्यामुळे दुर्दैवाने औरंगजेब आणि देवेंद्र फडणवीस यांचा कारभार हा सारखाच आहे", असं विधान हर्षवर्धन सपकाळ यांनी केलं आहे.हर्षवर्धन सपकाळ यांनी यावेळी महायुती सरकारवर जोरदार टीका केली आहे. त्यांनी म्हटलं की, "महाराष्ट्राच्या सत्तेत तर टोळ्या एकत्र येऊन सरकार स्थापन झालं आहे. या टोळ्या एकत्र आल्यामुळे सरकारच्या मंत्र्यांमध्ये बेबनाव, अहंकाराचा खेळ सुरू असल्याचं दिसत आहे.

काही दिवसांपूर्वी 'गँग्स ऑफ वासेपूर' नावाचा एक चित्रपट आला होता. तो चित्रपट जसा होता, तसं महाराष्ट्रातील सत्तेत 'गँग्स ऑफ सरकार' असा खेळ सुरु आहे. मानापमान आणि अहंकाराचाही खेळ सुरु आहे. या सर्वांची किंमत महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेला चुकवावी लागत आहे", असं हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटलं आहे.काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची थेट औरंगजेबाशी तुलना करणारे विधान केलं आहे.

हर्षवर्धन सपकाळ यांनी देवेंद्र फडणवीस यांची तुलना औरंगजेबाशी केल्यामुळे त्यांच्यावर आता टीकेची झोड उठली आहे. यावरून आता राज्याचं राजकारण पुन्हा एकदा तापलं आहे. "औरंगजेब क्रूर शासक होता, आज देवेंद्र फडणवीसही तेवढेच क्रूर आहेत", असं विधान हर्षवर्धन सपकाळ यांनी माध्यमांशी बोलताना केलं आहे. त्यांच्या या विधानानंतर आता भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांकडून सपकाळ यांच्यावर टीका करण्यात येत आहे. औरंगजेब हा क्रूर शासक होता. औरंगजेबाने स्वत:च्या वडिलांना जेलमध्ये टाकलं. तसेच औरंगजेब हा नेहमी धर्माचा आधार घ्यायचा. औरंगजेब हा क्रूर शासक होता. आज देवेंद्र फडणवीस हे देखील तेवढेच क्रूर आहेत.

### 'गँग्स ऑफ सरकार' असा खेळ सुरु

दुर्दैवाने औरंगजेब आणि देवेंद्र फडणवीस यांचा कारभार हा सारखाच आहे", असं विधान हर्षवर्धन सपकाळ यांनी केलं आहे. हर्षवर्धन सपकाळ यांनी यावेळी महायुती सरकारवर जोरदार टीका केली आहे. त्यांनी म्हटलं की, "महाराष्ट्राच्या सत्तेत तर टोळ्या एकत्र येऊन सरकार स्थापन झालं आहे. या टोळ्या एकत्र आल्यामुळे सरकारच्या मंत्र्यांमध्ये बेबनाव, अहंकाराचा खेळ सुरू असल्याचं दिसत आहे. काही दिवसांपूर्वी 'गँग्स ऑफ वासेपूर' नावाचा एक चित्रपट आला होता. तो चित्रपट जसा होता, तसं महाराष्ट्रातील सत्तेत 'गँग्स ऑफ सरकार' असा खेळ सुरु आहे.

# फोनवर 'हॅलो' नाही, तर 'जय शिवराय' बोला'

## आपला पक्ष छत्रपतींच्या विचारांना माननारा पक्ष : शशिकांत शिंदे

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**महाराष्ट्रात सध्या मध्ययुगीन काळातील छत्रपती शिवाजी महाराजांशी निगडित इतिहास आणि मुघल शासकांवरील राजकीय चर्चांना उधाण आले आहे. यात आता राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचीही भर पडली आहे. पक्षाच्या मेळाव्यात आमदार शशिकांत शिंदे यांनी कार्यकर्त्यांना संबोधित करताना म्हटले की, यापुढे फोनवर बोलताना हॅलो ऐवजी 'जय शिवराय' असे म्हणावे. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची ही संकल्पना असल्याचे शशिकांत शिंदे यांनी सांगली येथे पार पडलेल्या मेळाव्यात बोलताना म्हटले.**






सांगलीतील मेळाव्यात बोलत असताना शशिकांत शिंदे म्हणाले की, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या निर्देशानुसार यापुढे फोनवरून बोलत असताना हॅलो ऐवजी 'जय शिवराय' असे संबोधन करून पुढील संभाषण सुरू करावे. यावेळी मंचावर जयंत पाटील यांच्यासह हर्षवर्धन पाटील, रोहित पाटील अशा नेत्यांची उपस्थिती होती.छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार विशद करत असताना शशिकांत शिंदे म्हणाले, आपला पक्ष छत्रपतींच्या विचारांना माननारा पक्ष आहे. काही लोक शिवाजी महाराजांना आपल्यापासून हिरावून घेण्याचा प्रयत्न करत आहेत. पण आपण शिवरायांच्या विचारांचे खरे पाईक आहोत. त्यामुळेच मी आपल्या सर्वांना आवाहन करतो की, यापुढे फोनवर संभाषणांची सुरूवात करताना जय शिवराय म्हणावे. सांगलीपासून सुरू केलेला हा उपक्रम आपण राज्यभरात नेऊ. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनीही 'जय शिवराय' असे पोस्टर एक्स अकाऊंटवर शेअर करून या अभियानाची सुरुवात केल्याचे सुतोवाच दिले. पक्षातील आतील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, छत्रपती शिवाजी महाराजांचा वारसा सांगण्यासाठी पक्षाकडून विचारपूर्वक हे पाऊल उचलण्यात आले आहे. हिंदुत्ववादी विचारांच्या पक्षांकडून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाला या विषयावरून अनेकदा लक्ष्य करण्यात आलेले आहे.पक्षाच्या एका वरिष्ठ नेत्याने द इंडियन एक्सप्रेसशी बोलताना सांगितले की, भाजपाचे नेते, मंत्री यांनी अलीकडे केलेल्या टिप्पण्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाचे विकृतीकरण करणाऱ्या होत्या. आम्ही हे विकृतीकरण सहन करणार नाही. जय शिवराय, ही घोषणा देऊन आम्ही छत्रपतींच्या विचारांशी एकनिष्ठ असल्याचे दाखवून देत आहोत.सांगलीतील मेळाव्यात बोलत असताना शशिकांत शिंदे म्हणाले की, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या निर्देशानुसार यापुढे फोनवरून बोलत असताना हॅलो ऐवजी 'जय शिवराय' असे संबोधन करून पुढील संभाषण सुरू करावे.

### छत्रपतींच्या विचारांना माननारा पक्ष

मंचावर जयंत पाटील यांच्यासह हर्षवर्धन पाटील, रोहित पाटील अशा नेत्यांची उपस्थिती होती.छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार विशद करत असताना शशिकांत शिंदे म्हणाले, आपला पक्ष छत्रपतींच्या विचारांना माननारा पक्ष आहे. काही लोक शिवाजी महाराजांना आपल्यापासून हिरावून घेण्याचा प्रयत्न करत आहेत.

# आम्ही शांततेसाठी प्रयत्न केले!

## 2002 च्या गुजरात दंगलीबाबत पंतप्रधान मोदींचे स्पष्टीकरण

**। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**अमेरिकन पॉडकास्टर लेक्स फ्रीडमन यांचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबरोबरचा पॉडकास्ट आज प्रसारित झाला. या पॉडकास्टमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तब्बल तीन तास संवाद साधला. या संवादात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशातील विविध विषयांवर भाष्य केलं. तसेच भारत-चीन, भारत-पाकिस्तान यांच्यातील राजकीय संबंध सुधारण्याच्या संदर्भातही भाष्य केलं. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पाकिस्तानवर टीका केली. 'आम्ही शांततेसाठी प्रयत्न केले, पण प्रत्येकवेळी विश्वासघाताचा सामना करावा लागला', असं मोदींनी म्हटलं आहे.**

भारताने शांतता प्रस्थापित करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. मात्र, आम्हाला प्रत्येकवेळी शत्रुत्व आणि विश्वासघाताचा सामना करावा लागला", असं स्पष्ट करत पंतप्रधान मोदी यांनी पाकिस्तानशी संबंध सुधारण्याच्या आपल्या प्रयत्नांचा उल्लेख केला. तसेच जागतिक स्तरावर शांततेसाठी भारताची वचनबद्धता कायम असल्याचं अधोरेखित केलं.पंतप्रधान मोदींनी २०१४ मधील एका घटनेचीही उल्लेख केला. पंतप्रधान मोदींनी म्हटलं की, "२०१४ मध्ये शपथविधी सोहळ्यासाठी पाकिस्तानचे तत्कालीन पंतप्रधान नवाझ शरीफ यांना आमंत्रित केलं होतं. आशा होती की ते भारत-पाकिस्तान संबंधांसाठी एक नवीन सुरुवात करू शकतील. पण तसं झालं नाही. दरम्यान, पाकिस्तानचे लोकही हिंसाचार, अशांतता आणि दहशतीला कंटाळले असून त्यांनाही शांतता हवी आहे", असं मोदींनी म्हटलं.तसेच आपल्या पंतप्रधानपदाच्या पहिल्या कार्यकाळात पाकिस्तानशी संबंध सुधारण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा उल्लेख करताना मोदींनी म्हटलं की, "हे एक अनोख राजनैतिक पाऊल होतं. त्यावेळी ज्यांनी माझ्या परराष्ट्र धोरणावर प्रश्न उपस्थित केले होते, त्यांनाही आश्चर्य वाटलं होतं.



तेव्हा प्रणव मुखर्जी यांनी त्यांच्या पुस्तकात या याबाबत कौतुक केलं होतं", असंही ते म्हणाले.२००२ च्या गुजरात दंगलींकडे कसे पाहता? असं विचारलं असता मोदी म्हणाले की, "२००२ च्या दंगली भोवतीच्या चर्चेला खोटी कहाणी निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला. २००२ पूर्वी गुजरातमध्ये २५० हून अधिक दंगली झाल्या होत्या आणि जातीय हिंसाचार वारंवार होत होता. २००२ पूर्वी देशात सतत दहशतवादी हल्ले आणि अस्थिरतेचे वातावरण होते, त्यामुळे तणाव शिगेला पोहोचला होता. तेव्हा जगातही दहशतवादी कारवायांमध्येही वाढ दिसून आली होती. १९९९ मध्ये कंधार अपहरण प्रकरण झालं होतं, २००० मध्ये लाल किल्ल्यावर हल्ला झाला होता आणि २००१ मध्ये आपल्या संसदेवर हल्ला झाला होता. तो काळ मोठ्या आव्हानांचा होता. पण २००२ नंतर गुजरातमध्ये एकही मोठी दंगल घडलेली नाही. आता राज्यात कायमस्वरूपी शांतता आहे", असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं.२००२ ची आतापर्यंतची मोठी दंगली होती ही धारणा चुकीची आहे. वास्तविकता अशी आहे की २००२ पूर्वी गुजरातमध्ये जातीय दंगली झाल्या होत्या. तरीही २००२ प्रमाणे

### गुजरातमध्ये 250 हून अधिक दंगली

२००२ च्या गुजरात दंगलींकडे कसे पाहता? असं विचारलं असता मोदी म्हणाले की, "२००२ च्या दंगली भोवतीच्या चर्चेला खोटी कहाणी निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला. २००२ पूर्वी गुजरातमध्ये २५० हून अधिक दंगली झाल्या होत्या आणि जातीय हिंसाचार वारंवार होत होता.

त्या कधीही आंतरराष्ट्रीय बातम्या बनल्या नाहीत. तेव्हा आमच्या सरकारने स्थिरता आणण्याचे प्रयत्न केले. पण तरीही राजकीय विरोधक आणि माध्यमांच्या काही विशिष्ट गटांनी आमची प्रतिमा खराब करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा खोटेपणा पसरवण्याचा प्रयत्न झाला. पण शेवटी न्यायाचा विजय झाला आणि न्यायालयांनी माझे नाव निर्दोष ठरवले", असं मोदींनी म्हटलं आहे. भारताने शांतता प्रस्थापित करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. मात्र, आम्हाला प्रत्येकवेळी शत्रुत्व आणि विश्वासघाताचा सामना करावा लागला", असं स्पष्ट करत पंतप्रधान मोदी यांनी पाकिस्तानशी संबंध सुधारण्याच्या आपल्या प्रयत्नांचा उल्लेख केला. तसेच जागतिक स्तरावर शांततेसाठी भारताची वचनबद्धता कायम असल्याचं अधोरेखित केलं.पंतप्रधान मोदींनी २०१४ मधील एका घटनेचीही उल्लेख केला.पंतप्रधान नवाझ शरीफ यांना आमंत्रित केलं होतं. आशा होती की ते भारत-पाकिस्तान संबंधांसाठी एक नवीन सुरुवात करू शकतील. पण तसं झालं नाही. दरम्यान, पाकिस्तानचे लोकही हिंसाचार, अशांतता आणि दहशतीला कंटाळले असून त्यांनाही शांतता हवी आहे", असं मोदींनी म्हटलं.तसेच आपल्या पंतप्रधानपदाच्या पहिल्या कार्यकाळात पाकिस्तानशी संबंध सुधारण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा उल्लेख करताना मोदींनी म्हटलं की, "हे एक अनोख राजनैतिक पाऊल होतं.

---

# अमेरिकेत पाकिस्तानींना लवकरच प्रवासबंदी?

## डोनाल्ड ट्रम्प यांच्या निर्णयाचा पाकिस्तानवर परिणाम होणार?

**। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**गेल्या काही दिवसांपासून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अनेक निर्णयांचा धडाका लावला आहे. या निर्णयांमध्ये अमेरिकेतील बेकायदेशीर स्थलांतरितांविरुद्धचा मुद्दा असेल किंवा नवीन टॅरिफ धोरण (आयात शुल्क) या संदर्भातील निर्णयासह अनेक मोठे निर्णय डोनाल्ड ट्रम्प यांनी घेतले आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांच्या अनेक निर्णयांचा फटका जगातील देशांना बसला आहे. यातच आता ट्रम्प हे आणखी एक मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत आहेत.**

जगभरातील तब्बल ४१ देशांना अमेरिकेत प्रवेश बंदी अर्थात प्रवासावर निर्बंध लादण्यात येण्याची शक्यता आहे. या संदर्भातील निर्णयाबाबत डोनाल्ड ट्रम्प यांचं प्रशासन सध्या हालचाली करत असल्याची माहिती समोर येत आहे. न्यू यॉर्क टाईम्सच्या हवाल्याने इंडियन एक्स्प्रेसने या संदर्भातील वृत्त दिलं आहे. एवढंच नाही तर या प्रवेश बंदीचे तीन श्रेणीत विभाग करण्यात आले आहेत. यामध्ये रेड, ऑरेंज आणि येलो अशा प्रकारचे झोन देखील करण्यात येणार आहेत.अमेरिकन सरकारने याबाबतचा एक मसुदा तयार केला आहे. यामध्ये पाकिस्तानसह ४१ देशांना अमेरिकेत प्रवासबंदी करण्यात येणार आहे. हा प्रस्तावित मसुदा डोनाल्ड ट्रम्प



यांच्या पहिल्या कार्यकाळात लागू केलेल्या प्रवास निर्बंधांपेक्षा जास्त व्यापक असणार आहे, अशी माहिती सांगितली जात आहे. बेलारूस, इरिट्रिया, हैती, लाओस, म्यानमार, पाकिस्तान, रशिया, सिएरा लिओन, दक्षिण सुदान आणि तुर्कमेनिस्तान या देशांच्या नागरिकांना प्रवास प्रतिबंधित असेल. परंतु पूर्णपणे बंद केला जाणार नाही. या देशांवर काही अटींसह बंदीचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. दरम्यान, पाकिस्तान, भूतान आणि म्यानमारसह २६ देशांच्या सरकारांनी ६० दिवसांच्या आत त्रुटी दूर करण्यासाठी पावले उचलली नाहीत तर त्यांना अमेरिकन व्हिसा जारी करण्यावर अंशतः बंदी घालण्याचा विचार केला

### पूर्ण व्हिसा निलंबन

डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाने ४१ देशांच्या ३ याद्या तयार केल्या आहेत. यातील पहिल्या रेड यादीत १० देशांचा समावेश आहे. यात अफगाणिस्तान, भूतान, क्युबा, इराण, लिबिया, उत्तर कोरिया, सोमालिया, सुदान, सीरिया, व्हेनेझुएला या देशांचा असेल. या देशातील नागरिकांना अमेरिकेत प्रवास करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

जाईल, अशी माहिती सूत्रांच्या हवाल्याने सांगितली जात आहे. दरम्यान, अमेरिकेने पाकिस्तानला २६ देशांच्या यादीत ठेवलं आहे. पाकिस्तानसह या २६ देशांना व्हिसा जारी करण्यावर अंशतः बंदीचा सामना करावा लागू शकतो. पण जर या २६ देशांतील मग पाकिस्तानसह ज्या त्या सरकारने जर सुरक्षा नियमांमधील उणिवा ६० दिवसांत दूर केल्या तर यामधून सूट दिली जाऊ शकते असंही म्हटलं जात आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाने ४१ देशांच्या ३ याद्या तयार केल्या आहेत. यातील पहिल्या रेड यादीत १० देशांचा समावेश आहे. यात अफगाणिस्तान, भूतान, क्युबा, इराण, लिबिया, उत्तर कोरिया, सोमालिया, सुदान, सीरिया, व्हेनेझुएला या देशांचा असेल. या देशातील नागरिकांना अमेरिकेत प्रवास करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

# 'सिटीसुंदर' अन् १२ 'गावरान ब्रो' आहेत तरी कोण?

'झी मराठी'च्या 'चल भावा सिटीत' या नव्याकोऱ्या शोच्या माध्यमातून अभिनेता श्रेयस तळपदे छोट्या पडद्यावर कमबॅक केलं आहे. या कार्यक्रमाने ग्रामीण आणि शहरी पार्श्वभूमीतील स्पर्धकांना एकत्र आणलं आहे. ग्रामीण आणि शहरी भागातले स्पर्धक एकमेकांना आव्हान देतील अशी या कार्यक्रमाची संकल्पना आहे. या शोमध्ये कोणकोणते कलाकार असतील याबद्दल प्रेक्षकांच्या मनात उत्सुकता निर्माण झाली होती. अखेर १५ मार्चला पार पडलेल्या प्रीमियरमध्ये प्रेक्षकांना सहभागी स्पर्धकांची ओळख होस्ट श्रेयस तळपदने करून दिलेली आहे.अनुश्री माने – मूळची पुण्याची. अनुश्रीचा जन्म वाई येथे झाला. नृत्यांगना, मॉडेल, अभिनेत्री आणि सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर म्हणून तिची ओळख आहे. ती युट्युबवर 'शाला' नावाच्या वेब सीरिजमुळे प्रसिद्ध झाली. गुरलीन कौर – मूळची ठाण्याची. ती एक कॉन्टेन्ट क्रिएटर आहे. स्वभावाने विनोदी, बबली आणि गोंडस आहे. २०२१ मध्ये तिने 'मिस लुधियाना' खिताब जिंकला आहे . गुरलीन महाराष्ट्रीय नसली तरी, छान मराठी बोलते. तिला मेकअप करायला खूप आवडतं. अभिनेत्री गायत्री दातार – मूळची पुण्याची. इंजनिअरिंगपर्यंत तिचं शिक्षण पूर्ण झालेलं आहे. तिला ट्रेकिंग करायला आवडतं. ती गोष्टींबद्दल खूप निवडक आहे आणि तिला स्वच्छता आवडते. तिला भूक सहन होत नाही. श्रुती राऊळ – मूळची मुंबईची. अभिनय आणि मॉडेलिंगमध्ये करिअर करतेय. स्वभावाने धाडसी आहे.

# 'छावा'मधील भूमिका का नाकारली?





लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित 'छावा') चित्रपटने धुमाकूळ घातल्याचे पाहायला मिळाले. या चित्रपटात विकी कौशल, रश्मिका मंदाना, अक्षय खन्ना हे कलाकार प्रमुख भूमिकेत दिसले आहेत. विकी कौशलने छत्रपती संभाजी महाराजांची भूमिका साकारली आहे. त्याने साकारलेल्या या भूमिकेचे मोठे कौतुकही होताना दिसत आहे. आता लोकप्रिय मराठी अभिनेते अशोक शिंदे यांनी छावा चित्रपटात भूमिका साकारण्याची संधी असताना, ती का नाकारली यावर एका मुलाखतीत वक्तव्य केले आहे.अशोक शिंदे यांनी नुकतीच 'लोकशाही मराठी फ्रेंडली'ला मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांना विचारण्यात आले की लक्ष्मण उतेकर यांनी तुम्हाला छावा चित्रपटासाठी ऑफर दिली होती. आज तो सिनेमा गाजतोय.

# भूमिजाने सोशल मीडियावर काही फोटो शेअर केले



सध्या झी मराठी वाहिनीवर मालिकांचा महासंगम पाहायला मिळत आहे. त्यामध्ये 'पारू', 'नवरी मिळे हिटलरला' , 'लक्ष्मी निवास', 'लाखात एक आमचा दादा', 'शिवा', 'सावळ्याची जणू सावली' या मालिकांचा समावेश आहे. नायिका विरुद्ध खलनायिका अशा स्वरूपाची थीम या महासंगममध्ये पाहायला मिळत आहे. होळीच्या निमित्ताने हे कलाकार एकत्र आले आहेत. मालिकेशिवाय या कलाकारांच्या डान्सचे व्हिडीओही सोशल मीडियावर व्हायरल होताना दिसत आहेत. आता या सगळ्यात 'नवरी मिळे हिटलरला'मधील अभिनेत्रीने काही फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. 'नवरी मिळे हिटलरला'फेम अभिनेत्री भूमिजा पाटीलने सोशल मीडियावर काही फोटो शेअर केले आहेत. या पोस्टच्या सुरुवातीच्या काही फोटोंमध्ये अभिनेत्री पूर्वा शिंदे दिसत आहे. पुढे काही ग्रुप फोटो दिसत आहेत, ज्यामध्ये लक्ष्मी निवास, सावळ्याची जणू सावली, शिवा मालिकेतील अभिनेत्री दिसत आहेत. सगळ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत आहे. काही फोटोंमध्ये अभिनेत्रींच्या हाताला रंग असल्याचेदेखील दिसत आहे. हे फोटो शेअर करताना भूमिजाने पूर्वा शिंदे, झी मराठी वाहिनी, 'नवरी मिळे हिटलरला'च्या इन्स्टाग्राम अकाउंटला टॅग केले आहे.फोटो शेअर करताना अभिनेत्रीने, "जेव्हा दोन खलनायिका भेटतात", असे लिहिले आणि पुढे हार्ट इमोजी शेअर केली.

# चर्चेत राहिलेल्या जोडप्याचे ब्रेकअप?





'बिग बॉस'(BIGG BOSS) हा शो नेहमीच विविध कारणांमुळे चर्चेत असतो. आतापर्यंत बिग बॉसचे १८ सीझन या प्रेक्षकांच्या भेटीला आले आहेत. प्रत्येक सीझनचे काहीतरी वेगळेपण दिसले आहे. या शोमध्ये अनेक सेलिब्रिटीदेखील सहभागी होतात. काही वेळा काही जोडपीदेखील बिग बॉसच्या घरात स्पर्धक म्हणून सहभागी झाली आहेत. त्यामध्ये रुबिना दिलैक-अभिनव शुक्ला, अंकिता लोखंडे-विकी जैन यांचा समावेश होता. त्याबरोबरच काही स्पर्धक बिग बॉसच्या घरात आल्यानंतर एकमेकांच्या प्रेमात पडतात; तर काही कलाकार रिलेशनशिपमध्ये असल्याच्या चर्चांना उधाण येते. अशाच चर्चेत असलेल्या एक जोडीपेकी अंकित गुप्ता आणि प्रियांका चहर चौधरी यांची जोडी आहे. आता मात्र बिग बॉसमध्ये झळकलेले अंकित गुप्ता आणि प्रियांका चहर चौधरी यांचे ब्रेकअप झाल्याचे म्हटले जात आहे. अंकित गुप्ता आणि प्रियांका चहर चौधरी या दोन कलाकारांना 'उडारियाँ' या मालिकेतून लोकप्रियता मिळाली होती. 'उडारियाँ' या शोनंतरही ते अनेकदा सोशल मीडियावर फोटो शेअर करीत असल्याचे दिसले होते. त्यानंतर ते बिग बॉस १६ मध्ये स्पर्धक म्हणून सहभागी झाले होते. त्यानंतर ते एकमेकांना डेट करीत असल्याचे म्हटले जात होते. इतकेच नाही, तर ते लवकरच लग्न करतील, अशा चर्चांनाही उधाण आले होते.

# अक्षयच्या वाढदिवशी समृद्धीने केलंय प्रॉमिस



'बिग बॉस मराठी'च्या चौथ्या पर्वाचा विजेता अभिनेता अक्षय केळकर आणि 'फुलाला सुगंध मातीचा' फेम अभिनेत्री समृद्धी केळकर हे दोघंही अनेक वर्षांपासून एकमेकांचे खूप चांगले मित्र आहेत. या दोघांनी एकत्र 'दोन कटिंग' या सीरिजमध्ये काम देखील केलेलं आहे. आज जिवलग मित्राच्या वाढदिवसानिमित्त समृद्धीने सुंदर पोस्ट लिहित अक्षयला शुभेच्छा दिल्या आहेत. समृद्धीने अक्षयला एक खास प्रॉमिस केलं आहे... ते प्रॉमिस आहे डान्स प्रशिक्षणाचं. समृद्धीने अक्षयचं वाढदिवसानिमित्त कौतुक केल्यावर शेवटी "या वर्षी मी नक्की तुला डान्स शिकवणार..." असं म्हटलं आहे.यावर अक्षय केळकर उत्तर देत म्हणतो, "बाकी शेवटचं प्रॉमिस या जन्मात तुला शक्य नाही. ओळखतो गं मी तुला...तुला वाटत नसलं तरी..." यापुढे अभिनेत्याने हसण्याचे इमोजी जोडले आहेत. समृद्धीने मित्राचं कौतुक करत नेमकं काय लिहिलंय पाहुयात...आपलं नातं खरंतर आपल्यालाच माहीत कारण, लोकांनी आपल्याला कलाकार म्हणून ओळखण्याआधी आपण एकमेकांना ओळखतो. काय कसं केव्हा याची उत्तरं काही महत्वाची नाहीत, महत्वाचं काय आहे ती म्हणजे आपली मैत्री. जी आधीही होती, आजही आहे आणि कायम असणार आहे. अभिनय क्षेत्रातली माझ्या आयुष्यातली पहिली ऑडिशनही तू म्हणालास म्हणून दिलेली आणि त्याच AUDITION आणि मालिकेमुळे मला अभिनेत्री म्हणून ओळख मिळाली. तेव्हापासून आजवर पुन्हा कधी मागे फिरायचा विचार केला नाही आणि जेव्हा कधी तो आला तेव्हा माझ्या आधी तू त्याला पळवून लावलंस. मित्र कितीही प्रेमळ असला, तरीही तो कर्तृत्ववान असला तर अभिमान थोडा जास्त असतो... तू आजवर हिंदी सिरियल्स, बिग बॉस, मराठी सिरियल, चित्रपट असं बरंच कमाल-कमाल काम केलं आहेस. पण त्याहूनही बऱ्याच जणांना जे जमत नाही असं मुंबईत स्वतःचं घर, गाडी एकूण सगळंच करून मोकळा झाला आहेस याचा तुझी जवळची हक्काची मैत्रीण म्हणून प्रचंड अभिमान वाटतो.लोकांना तू इंडस्ट्रीत कसा आहेस, पर्सनल लाईफमध्ये कसा आहेस वगैरे काहीही, कसंही वाटू दे... आम्हाला माहीत आहे... अक्षय केळकर कसा आहे... शिवराळ असलास तरी माझ्या बाबांनंतर मला समजून घेणारा, मला माझ्यापेक्षा जास्त ओळखणारा, M JUST A CALL AWAY या वाक्याला प्रत्येक वेळी खरं ठरवणारा, काळजी घेणारा माणूस, मित्र अजून कोणी भेटला नाही. एवढ्या वर्षांची ओळख पण खूप कमी काम एकत्र केलं... येणाऱ्या वर्षात बऱ्याच मालिका आणि चित्रपटांमध्ये एकत्र काम करूच. आता लवकरच तुझा नवीन चित्रपट येतोय त्यासाठी तुला भरभरून शुभेच्छा... आणि ह्या सगळ्याबरोबर वाढणाऱ्या वयाची आठवण करून देणाऱ्या तुझ्या वाढदिवसाच्या ही तुला अनंत शुभेच्छा!!दरम्यान, समृद्धीच्या पोस्टवर सेलिब्रिटींसह नेटकऱ्यांनी देखील कौतुकाचा वर्षाव केला आहे.


# रमजान महिन्यात होळी खेळणे गुन्हा!

## रमजानच्या टीकेनंतर मौलानाकडून आता शमीची मुलगी लक्ष्य

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**रमजानच्या महिन्यात भारतीय क्रिकेट संघाचा गोलंदाज मोहम्मद शमीने उपवास न केल्याबद्दल ऑल इंडिया मुस्लीम जमातचे अध्यक्ष मौलाना शाहबुद्दीन रझवी यांनी त्याच्यावर टीका केली होती. शमीने शरियत कायद्यानुसार पाप केले आहे, असा आरोप रझवी यांनी एका व्हिडीओद्वारे केला होता. आता त्यांनी एक नवीन व्हिडीओ प्रसारित केला असून त्यात मोहम्मद शमीच्या मुलीवर टीका केली आहे.रझवी म्हणाले, “मोहम्मद शमीची मुलगी लहान आहे.**





तिने अजाणतेपणी होळीत रंग उधळले असतील तर तो गुन्हा नाही. पण तिला समज असेल आणि ती जाणूनबुजून होळी खेळली असेल तर हा शरीयत नुसार गुन्हा आहे.” रझवी पुढे म्हणाले की, शमीला यापूर्वीही इस्लामच्या तत्त्वांचे पालन करण्याचा सल्ला दिला होता. पण तरीही त्याच्या मुलीचा होळी साजरा करतानाचा व्हिडीओ समोर आला आहे.मोहम्मद शमी आणि त्याच्या परिवाराला मी आवाहन केले होते की, जे शरीयतमध्ये नमूद केलेले नाही, त्यात तुमच्या मुलांना सहभागी करू नका. होळी हा हिंदूंचा निश्चितच मोठा सण आहे. पण मुस्लीम लोकांनी होळीपासून दूर राहिले पाहिजे. जर शरीयतचा कायदा माहीत असूनही जर कुणी होळी खेळत असेल तर तो गुन्हा ठरतो”, अशी प्रतिक्रिया मौलाना रझवी यांनी दिली आहे.याशिवाय रझवींनी मोहम्मद शमीवर रोजा न पाळल्याबद्दल टीका केली होती. पण भारतीय संघाने चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकल्यानंतर त्यांनी संघाचे कौतुक केले आहे. मी टीम इंडियाचे अभिनंदन व्यक्त करतो. तसेच मोहम्मद शमीलाही मनापासून शुभेच्छा देतो, असे मौलाना रझवी म्हणाले.काही दिवसांपूर्वीच मौलाना रझवींनी शमीवर टीका केली होती. ते म्हणाले होते,“इस्लाममध्ये रोझा पाळणे हे कर्तव्य आहे. एखादी व्यक्ती जाणून बुजून रोजा पाळत नसेल तर तो अट्टल गुन्हेगार आहे. मोहम्मद शमीने रोजा पाळला नाही. मुळात ते त्याचे कर्तव्य आहे. रोजा न पाळून मोहम्मद शमीने मोठा गुन्हा केला. शरीयतच्या नियमानुसार तो मोठा गुन्हेगार आहे. त्याला आता माफी मागावी लागेल.” रमजानच्या महिन्यात भारतीय क्रिकेट संघाचा गोलंदाज मोहम्मद शमीने उपवास न केल्याबद्दल ऑल इंडिया मुस्लीम जमातचे अध्यक्ष मौलाना शाहबुद्दीन रझवी यांनी त्याच्यावर टीका केली होती. शमीने शरियत कायद्यानुसार पाप केले आहे.तिने अजाणतेपणी होळीत रंग उधळले असतील तर तो गुन्हा नाही. पण तिला समज असेल आणि ती जाणूनबुजून होळी खेळली असेल तर हा शरीयत नुसार गुन्हा आहे.” रझवी पुढे म्हणाले की, शमीला यापूर्वीही इस्लामच्या तत्त्वांचे पालन करण्याचा सल्ला दिला होता.

### होळी हा हिंदूंचा मोठा सण

मोहम्मद शमी आणि त्याच्या परिवाराला मी आवाहन केले होते की, जे शरीयतमध्ये नमूद केलेले नाही, त्यात तुमच्या मुलांना सहभागी करू नका. होळी हा हिंदूंचा निश्चितच मोठा सण आहे. पण मुस्लीम लोकांनी होळीपासून दूर राहिले पाहिजे.

जर शरीयतचा कायदा माहीत असूनही जर कुणी होळी खेळत असेल तर तो गुन्हा ठरतो”, अशी प्रतिक्रिया मौलाना रझवी यांनी दिली आहे.याशिवाय रझवींनी मोहम्मद शमीवर रोजा न पाळल्याबद्दल टीका केली होती. पण भारतीय संघाने चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकल्यानंतर त्यांनी संघाचे कौतुक केले आहे. मी टीम इंडियाचे अभिनंदन व्यक्त करतो. तसेच मोहम्मद शमीलाही मनापासून शुभेच्छा देतो, असे मौलाना रझवी म्हणाले.काही दिवसांपूर्वीच मौलाना रझवींनी शमीवर टीका केली होती. ते म्हणाले होते, “इस्लाममध्ये रोझा पाळणे हे कर्तव्य आहे.

# भारत की पाकिस्तान कोणता संघ अधिक चांगला?

## लेक्स फ्रीडमन यांच्या पॉडकास्टमध्ये पंतप्रधान मोदींनी मांडली भूमिका

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकन पॉडकास्टर लेक्स फ्रीडमन यांच्या पॉडकास्टमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज विविध विषयांवर भाष्य करत तब्बल तीन तास संवाद साधला. या संवादात मोदींनी देशातील विविध विषयांवर भाष्य केलं. एवढंच नाही तर भारत-चीन, भारत-पाकिस्तान यांच्यातील राजकीय संबंध, रशिया आणि युक्रेनमधील संघर्ष, तसेच गुजरातच्या २००२ मधील दंगल प्रकरणावरही पंतप्रधान मोदींनी भूमिका मांडली. यावेळी मोदींना भारत आणि पाकिस्तानच्या क्रिकेट संघाबाबतही प्रश्न विचारण्यात आला. यावेळी मोदींनी आपल्या खास शैलीत उत्तर दिलं.**






भारतीय क्रिकेट संघ आणि पाकिस्तानी क्रिकेट संघात कोणता संघ अधिक सरस आहे? असा प्रश्न मोदींना विचारण्यात आला होता. यावर बोलताना मोदी म्हणाले की, “खेळ संपूर्ण जगाला ऊर्जा देण्याचं काम करतो, खेळाची भावना जगाला जोडण्याचं काम करते. त्यामुळे मला खेळांना बदनाम होताना बघायला आवडणार नाही. मी खेळाला मानवी विकासाच्या प्रवासातील महत्त्वाचा भाग मानतो”, असं मोदींनी म्हटलं.“आता कोण चांगलं आणि कोण वाईट यावर बोलायचं झालं तर मी यातला तज्ञ नाही. त्यामुळे मी याबाबत तांत्रिकरित्या काही सांगू शकत नाही. मात्र, यामधील जे तज्ञ आहेत ते याबाबत सांगू शकतील. पण भारत-पाकिस्तान सामना काही दिवसांपूर्वीच झाला आणि निकालांवरून हे स्पष्ट झालं की कोणता संघ चांगला आहे”, असं पंतप्रधान मोदी म्हणाले आहेत.भारत आणि पाकिस्तान यांच्यातील राजकीय तणावामुळे अनेक वर्षांपासून दोन्ही संघांमध्ये द्विपक्षीय मालिका झालेली नाही. तेव्हापासून टीम इंडिया आणि पाकिस्तानी संघ आशिया कप किंवा आयसीसी स्पर्धेत भिडत आहेत. गेल्या महिन्यातच दोन्ही संघांमध्ये सामना झाला होता. आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ अंतर्गत २३ फेब्रुवारी रोजी दुबईत सामना खेळला गेला. ज्यामध्ये भारतीय संघाने पाकिस्तानचा ६ विकेट्सने पराभव केला होता. भारतीय क्रिकेट संघ आणि पाकिस्तानी क्रिकेट संघात कोणता संघ अधिक सरस आहे?

### पाकिस्तानचा पराभव केला होता

असा प्रश्न मोदींना विचारण्यात आला होता. यावर बोलताना मोदी म्हणाले की, “खेळ संपूर्ण जगाला ऊर्जा देण्याचं काम करतो, खेळाची भावना जगाला जोडण्याचं काम करते. त्यामुळे मला खेळांना बदनाम होताना बघायला आवडणार नाही. मी खेळाला मानवी विकासाच्या प्रवासातील महत्त्वाचा भाग मानतो”, असं मोदींनी म्हटलं.“आता कोण चांगलं आणि कोण वाईट यावर बोलायचं झालं तर मी यातला तज्ञ नाही. त्यामुळे मी याबाबत तांत्रिकरित्या काही सांगू शकत नाही. मात्र, यामधील जे तज्ञ आहेत ते याबाबत सांगू शकतील. पण भारत-पाकिस्तान सामना काही दिवसांपूर्वीच झाला आणि निकालांवरून हे स्पष्ट झालं की कोणता संघ चांगला आहे”, असं पंतप्रधान मोदी म्हणाले आहेत.भारत आणि पाकिस्तान यांच्यातील राजकीय तणावामुळे अनेक वर्षांपासून दोन्ही संघांमध्ये द्विपक्षीय मालिका झालेली नाही. तेव्हापासून टीम इंडिया आणि पाकिस्तानी संघ आशिया कप किंवा आयसीसी स्पर्धेत भिडत आहेत. गेल्या महिन्यातच दोन्ही संघांमध्ये सामना झाला होता. आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ अंतर्गत २३ फेब्रुवारी रोजी दुबईत सामना खेळला गेला. ज्यामध्ये भारतीय संघाने पाकिस्तानचा ६ विकेट्सने पराभव केला होता.


Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
2025-26
ADMISSIONS
OPEN
PRIYADARSHANI
SCHOOL, ALANDI
42
YEARS OF ENRICHING
EXPERIENCE IN
EDUCATION
50
FIFTY PLUS NATIONAL &
INTERNATIONAL
AWARDS ACROSS
SCHOOLS
Contact Us Now
86687 55826
98232 31705
Wadgoan road, Sr.no. 98,
Opposite Ram Mandir,
Alandi 412105


( Since 2013)
MASTER MIND GLOBAL
SCHOOL & Jr. College
(CBSE)
ADMISSIONS
OPEN FOR
NURSERY TO 12TH
Where There is
Creativity, There is
Master Mind
7
STAR
RANKING
Excellence in Education & Disciplined Environment
Co-Curricular & Extra Curricular Activities
Guaranteed Safety & Security
Contact : +91 7218125125
E-mail : mastermindglobalschool.com
A++ Grade
In Leadership & Quality
Management
Website : www.http://mastermindglobalschool.com


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046

# शिक्षण, करियरबाबत "फोकस" रहा - डॉ. वर्णेकर

## शिक्षण विश्व; चिखलीतील आयआयबीएम कॉलेजमध्ये विविध क्षेत्रातील महिलांचा सन्मान

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**संकटांना न घाबरता विद्यार्थिनींनी आपले शिक्षण, करियर यांच्याबाबत "फोकस" राहिले पाहिजे. यासाठी पालक शिक्षक त्या शिक्षण घेत असलेल्या संस्थेकडून योग्य मार्गदर्शन मिळाल्यास विद्यार्थिनी कुठल्याही क्षेत्रात यशस्वी होऊ शकतात असे मत चिखलीतील आय आय बी एम कॉलेजचे संस्थाध्यक्ष डॉ. धनंजय वर्णेकर म्हणाले.**



चिखलीतील आयआयबीएम कॉलेजमध्ये दरवर्षीप्रमाणे जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. महिला दिनानिमित्त विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या महिलांचा सन्मान करण्यात आला. सत्कारमूर्तीमध्ये चिखली पोलीस ठाण्यातील श्रीमती देशमुख, श्रीमती लोहकरे, ॲड .प्रीती साठे, दंतचिकित्सक डॉ. सुजाता पिंगळे यांचा समावेश होता. संस्थाध्यक्ष डॉ. धनंजय वर्णेकर यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले.

कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थिनींना कायदा, सुव्यवस्था, वैद्यकीय यासंदर्भात मोलाचे मार्गदर्शन यावेळी करण्यात आले. यावेळी कॉलेजचे प्राचार्य प्रो. प्रदीप फुलकर, विभागप्रमुख अमोल भागवत, विभागप्रमुख अनिकेत वंजारी, प्रशासकीय प्रमुख प्रतिक्षा डफळ, डॉ. गरिमा मलिक उपस्थित होत्या. यावेळी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना पोलीस अधिकारी देशमुख यांनी सायबर गुन्हे कशा पद्धतीने घडतात व त्याला आपण बळी न पडता कसे धीटपणे सामोरे गेले पाहिजे व कोणतेही संकट असल्यास आपण व्यक्त झाले पाहिजे . तर लोहकरे म्हणाल्या, परिस्थिती हालाखीची असताना सुद्धा जिद्दीने लढले पाहिजे. ॲड . साठे यांनी विद्यार्थिनींना कोणत्या गुन्ह्याला कोणता कायदा वापरला जातो किंवा कायदा हा विद्यार्थिनींच्या बाजूने कसा असतो हे पटवून सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रेरणा कणावजे यांनी तर आभारप्रदर्शन माधुरी सकुंडे यांनी केले.

> "विद्यार्थिनीना सक्षम करून त्या आर्थिक दृष्ट्याही सक्षम झाल्या पाहिजेत, उच्च पदावर पोहचल्या पाहिजे, संकटांना न घाबरता परदेशात त्यांनी त्यांचे नाव गाजविले पाहिजे यासाठी आम्ही नेहमी प्रयत्नशील आहे. कॉलेजच्या मार्गदर्शनाखाली आज बहुतांश विद्यार्थिनी भारतातच नाही तर परदेशातही स्वतःचे, आई वडिलांचे आणि कॉलेजचेही नाव उंचावत आहेत.
> –**डॉ. धनंजय वर्णेकर** संस्थाध्यक्ष, आयआयबीएम कॉलेज , चिखली

# 'आयआयबी' च्या विद्यार्थ्यांचे 15 तास स्वयंअध्ययन!

## शिक्षण विश्व: आयआयबी करिअर इन्स्टिट्यूट च्या मोहिमेत 200 हून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग



। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**आयआयबी करिअर इन्स्टिट्यूट पिंपरी शाखेच्या वतीने विद्यार्थ्यांनी विक्रम प्रस्थापित केला. विद्यार्थ्यांनी सलग पंधरा तास स्वयंअध्ययन रेकॉर्ड केले.**

पुणे विभागाचे संचालक ॲड.महेश लोहारे यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांच्या स्वयंशिक्षण क्षमतेला चालना देण्यासाठी आयआयबी विद्यासंकुल, पिंपरी कॅम्पसमध्ये १५ तास स्वयंअध्ययनाची विद्यार्थी प्रेरित मोहीम (दि. १५) यशस्वीरित्या पूर्ण झाली.

आंतरराष्ट्रीय गणित दिवसाचे औचित्य साधून हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाला २०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

> "शिक्षण हाच उज्वल भविष्यासाठी सर्वोत्तम मार्ग असून, ज्ञानप्राप्तीच्या दिशेने विद्यार्थ्यांचा हा सकारात्मक दृष्टिकोन निश्चितच त्यांना यशाकडे घेऊन जाईल.
> –ॲड.महेश लोहारे,
> **संचालक, 'आयआयबी' इन्स्टिट्यूट पिंपरी**